मानवतेचा आदर्श

अनुवाद

मुबारक हुसैन मनियार

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

मानवजीवनाला कल्याण व सदाचाराच्या मार्गावर चालविण्यासाठी एखाद्या आदर्शाची आवश्यकता असते. आदर्श खरे पाहता मापदंडाचे काम करतो. यावर मापून तोलून हे कळते की एखाद्या व्यक्तीच्या व्यवहाराचा किती भाग खरा व किती भाग खोटा आहे. मापदंड अथवा आदर्श काल्पनिकदेखील असतात, जे कथा-गोष्टीच्या रूपाने उपदेशांत सांगितले जातात व ते ऐकून लोक आनंदित होतात. परंतु त्याचा कोणताही प्रत्यक्ष लाभ वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनात होत नाही. आदर्श बनण्यासाठी केवळ इतकेच आवश्यक नाही की ते शक्य व व्यावहारिक असावे, तर हेदेखील गरजेचे आहे की तो आदर्श एखाद्याचे जीवन बनलेले असावे व त्याने त्यावर चालून आदर्शाचा प्रत्यक्ष नमुना प्रस्तुत केला असावा. त्या माणसाच्या हृदयात मानवासाठी इतके प्रेम असावे की कोणीही त्याला आपला हितचिंतक मानावे. त्याच्या प्रेमात निमग्र होऊन त्याचे आदर्श आत्मसात करण्यासाठी त्याला नेऊ लागावे. यासाठी त्याने केवळ धनसंपत्तीची लयलूट करण्याचीच तयारी ठेवावी असे नव्हे, तर त्याने आपल्या प्राणाचे बलिदान करण्याचीदेखील तयारी ठेवावी.

इतिहासात अशा अगणित महापुरुषांचा उल्लेख आहे, ज्यांनी आपल्या सर्वस्वाची मानवतेच्या उत्थान व मुक्तीसाठी होळी केली, मानवाला योग्य मार्गदर्शन केले, त्या सर्वांवर अल्लाहची अपार कृपा असो! जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात, इतिहासात कोणत्याही काळात आणि मानवांच्या कोणत्याही जातीत त्यांचा जन्म झालेला असो; आम्ही त्यांना प्रणाम करतो व आपले हार्दिक श्रध्दासुमन त्यांना अर्पित करतो. ते सर्वजण आमच्यासाठी आदर्श पुरुष होत.

असे असले तरी ही गोष्ट नाकारता येत नाही की कालांतराने त्यांचे जीवनचरित्र व त्यांच्या शिकवणी सुरक्षित राहू शकली नाहीत. काही असले पुरावे उपलब्ध आहेत ज्यावरून असा निष्कर्ष काढता येतो की त्यांच्या जीवनप्रणाली व त्यांच्या शिकवणीसंबंधी विस्ताराने माहिती मिळविण्यासाठी आमच्याजवळ कोणतेही प्रामाणिक साधन नाही. अल्लाहची ही मोठी कृपा होय की त्या महान विभूतींपैकी एका महान व्यक्तीचे संपूर्ण जीवन इतिहासाच्या प्रकाशझोतात आहे. त्यांच्या जीवन आणि शिकवणीसंबंधी जी काही माहिती आम्हाला हवी ती मिळू शकते. त्यात अंदाज लावण्याची गरज नाही. त्यांचे व्यक्तिगत जीवन, सामाजिक जीवन व राजकीय जीवन सर्वकाही प्रकाशासारखे स्पष्ट आहे. हा प्रकाशपुंज संपूर्ण मानवजातीची अमूल्य ठेव आहे. हे व्यक्तित्व आहे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे.

जीवनाची एक झलक

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा इ. सन ५७१ मध्ये अरबस्तानातील मक्का या शहरात जन्म झाला. त्यांच्या जन्मापूर्वीच त्यांचे वडील परलोकवासी झाले. त्यांच्या बालपणातच त्यांची आई व आजोबा थोड्या-थोड्या अंतराने हे जग सोडून गेले. त्यांच्या चुलत्याने त्यांचे पालनपोषण केले. बालपणापासूनच त्यांच्या स्वभावात अशी नम्रता होती की संपूर्ण कुटुंब व शहरातील लोक त्यांचा आदर करीत असत. त्यांच्या खरेपणा व पुण्यशीलतेची चर्चा सर्वत्र होऊ लागली. बालपणी ते शेळ्या-मेंढ्या चारीत असत. तारुण्यात त्यांनी व्यापार सुरू केला. खदीजा (रजि.) नावाच्या एका धनाढ्य विधवेचा व्यापारी माल लादून नेत व बाजारपेठेत तो विकत असत. त्यांचा प्रामाणिकपणा व सद्‌गुण पाहून त्या विधवेने त्यांच्याशी विवाह करण्याचा प्रस्ताव केला व तो त्यांनी मान्य केला. ते त्या काळातील सामाजिक कुरीती व लोकांच्या दुःखाने अत्यंत दुःखी होत होते. ते एका गुहेत बसून अल्लाहचे चिंतन व समाजाच्या उद्धारासाठी प्रार्थना करीत असत. त्याच गुहेत त्यांना ईशआदेश येत असत. त्यांच्यावर अल्लाहकडून मानवजातीला मार्गदर्शन करण्याची मोठी कठीण जबाबदारी घातली गेली होती. अल्लाहने मानवकल्याणासाठी त्यांच्यावर 'पवित्र कुरआन' हा ग्रंथ उतरविला. अल्लाहच्या आज्ञेप्रमाणे ते मानवजातीला मार्गदर्शन करीत असत. समाजातील स्वार्थी व सत्ताधारी लोकांनी त्यांना तीव्र विरोध केला. सज्जन आणि उपेक्षित लोकांनी त्यांची शिकवण आत्मसात केली. त्यांना व त्यांच्या साथीदारांना मक्का येथील दुष्ट लोकांनी घोर यातना दिल्या. त्यांना मक्का सोडून जाण्यास भाग पाडले. त्यांनी सुदूर मदीना शहरात आश्रय घेतला. मक्कावासियांनी तेथेसुध्दा आक्रमण केले. अनेक युद्धे झाली, तरीदेखील पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्याशी दयापूर्ण व्यवहार केला. जेव्हा मक्का शहरात दुष्काळ पडला तेव्हा, त्यांनी मदीना शहरातून उंटावर धान्य लादून पाठविले. इस्लामी शिकवणींचा प्रचार चालूच राहिला. जेव्हा अरबस्तानात इस्लामचा सर्वत्र प्रसार झाला आणि अधिकांश मक्कावासियांनी इस्लामचा स्वीकार केला तेव्हा मक्का शहरावर पैगंबर मुहम्मद (स.) यांना विजय प्राप्त झाला व ते परत मक्का शहरी परतले. ही अशी वेळ होती जेव्हा त्यांना विरोधकांवर भरपूर सूड उगवता आला असता, परंतु त्यांनी त्या दुष्ट व अत्याचारी मंडळींना क्षमा केली. इतकेच नव्हे तर त्यांना सन्मान व श्रेष्ठत्व दिले. विजेत्याच्या या व्यवहाराने लोक अत्यंत प्रभावित झाले व त्यांनी मान्य केले की सत्य पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बाजूने आहे आणि त्यांनीसुद्धा सत्याच्या सेवेसाठी स्वतःला अर्पण केले.

त्यांच्या जीवनकाळातच एका मोठ्या प्रदेशावर सत्याचे राज्य स्थापित झाले. या राज्यात गरीब, अनाथ आणि पीडित व उपेक्षितांना संपूर्ण सन्मान मिळाला. माणसामाणसांतील सर्व प्रकारचे भेदभाव संपले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली. ते स्वतः अत्यंत साधे जीवन जगत राहिले. दुसऱ्यांच्या सेवेकडे त्यांचे

इतके लक्ष होते की स्वत: न खाता दुसऱ्यांना ते खाऊ घालीत असत. त्यांच्या घरी कित्येक दिवस चूल पेटत नसे. काही खजूर खाऊन पाणी पीत असत. असे होते राज्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्याचे जीवन.

आपल्या अनुयायांतसुद्धा त्यांनी असेच गुण रूजविले की ते नि:स्वार्थीपणे अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी सेवाकार्यात निमग्न राहत असत. स्वार्थ व भोगविलापासून ते दूर पलायन करीत. त्या सर्व लोकांच्या एकत्रित प्रयत्नामुळे पाहता पाहता आशिया, यूरोप व आफ्रिका खंडांच्या मोठ्या भूभागात इस्लामचा प्रसार झाला. काळे-गोरे, उच्च-नीच, सबल-निर्बल यासारखे भेदभाव संपुष्टात आले. अज्ञान व अंधकार नाहीसा होऊ लागला. बुद्धी व विज्ञानाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. इस्लामचा आदर्श संपूर्ण जगात पसरला. मानवाधिकार, न्यायाधिष्ठित राज्य, शांती-स्थापना, सहानुभूती, स्वातंत्र्य व संपूर्ण मानवजातीशी बंधुत्वाची वागणूक यासारख्या तत्त्वांचा त्यांना स्वीकार करावा लागला, ज्यांनी प्रत्यक्षपणे इस्लामचा स्वीकार केलेला नव्हता. हे सिद्धान्त अस्तित्वात असूनदेखील जगात सध्या अन्याय व अराजकता पसरलेली आहे. याचे मूळ कारण असेच आहे की या शिकवणींचा स्वीकार मनापासून केला गेला नाही. केवळ लोकांना फसविण्यासाठी या आदर्शांचे प्रदर्शन केले जाते आणि त्यांच्या आडून स्वत:च्या स्वार्थाची पूर्तता केली जाते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनव्यवस्थेचा सार असा आहे की सत्य मार्गावर चालण्याची प्रेरक शक्ती अल्लाहवर विश्वास आणि त्याच्याशी प्रेम व त्याचे भय होय. तो न्यायपूर्ण रीतीने माणसांच्या कर्माचे फळ देणारा आहे. कोणताही चांगुलपणा अथवा वाईटपणा त्याच्यापासून लपविणे शक्य नाही. ईशप्रेमात मग्न होऊन त्याची प्रसन्नता व बक्षीस मिळविण्याची इच्छा मानवाला सत्यमार्गावर चालण्यास प्रवृत्त करते. त्याच्या कठोर यातनांपासून स्वत:चा बचाव करण्याची चिंता त्याला दुष्कृत्यापासून अलिप्त ठेवते. खरी गोष्ट अशी आहे की अल्लाहशी आस्था व परलोकातील जीवनाची कल्पना स्वीकारल्याशिवाय माणसात टिकाऊ उत्तम गुणांचा अविर्भाव शक्य नाही.

आज सर्वात मोठी आवश्यकता अशी आहे की पुन्हा त्या शिकवणी आत्मसात केल्या जाव्यात ज्या जीवनाला सत्यमार्गावर नेऊ शकतात. असे न केल्यास मानवता वेदना व दु:खापासून मुक्त होऊ शकणार नाही.

शिकवणींची एक झलक
(हदीस व कुरआनवरून संकलित)

- संपूर्ण सृष्टीचा निर्माता एकच अल्लाह आहे. तो अत्यंत दयाळू व कृपाळू आहे. त्याचीच भक्ती करा आणि त्याच्याच आज्ञेचे पालन करा.
- अल्लाहने मानवावर अगणित उपकार केलेले आहेत. पृथ्वी आणि आकाशातील सर्व शक्तींना मानवाच्या सेवेला लाविले आहे. तोच पृथ्वी आणि आकाशाचा स्वामी आहे, तोच तुमचा पूज्य ईश्वर आहे.
- अल्लाहला (स्वामीला) सोडून अन्य कोणाची पूजा करणे सर्वात मोठा जुलूम व व्यभिचार आहे.
- अल्लाहची अवज्ञा करून तुम्ही त्याचे काहीही बिघडवू शकत नाही. आज्ञाधारक बनून राहा, यातच तुमचे कल्याण आहे.
- अल्लाहच्या स्मरणाने आत्म्याला शांती लाभते. त्याच्या पूजेने मनाचे मळ नाहीसे होते.
- अल्लाहच्या निशाण्यांवर (दिवस, रात्र, पृथ्वी, आकाश, झाडे-झुडुपे, जीव-जंतूंची रचना) विचार करा. यामुळे अल्लाहवरील विश्वास दृढ होईल आणि संकुचित विचारांपासून मुक्ती मिळेल.
- मला (पैगंबर मुहम्मद स.) अल्लाहने जगाचा मार्गदर्शन म्हणून नेमले आहे. मला मार्गदर्शनासाठी तुमच्याकडून कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा नाही. माझे म्हणणे ऐका आणि माझ्या आज्ञेचे पालन करा.
- मी काही वेगळा आणि अपरिचित पैगंबर नाही. माझ्या अगोदर जगात मार्गदर्शन करण्यासाठी अनेक पैगंबर आलेले आहेत, आपल्या धर्मग्रंथात पाहा अथवा एखाद्या ज्ञानी माणसाकडून माहिती करून घ्या.
- मी पूर्वीच्या पैगंबरांच्या शिकवणींची पुनर्स्थापना करण्यासाठी व कपटीपणा करणाऱ्यांच्या बंधनातून मानवाला मुक्त करण्यासाठी आलो आहे.
- मला अशासाठी पाठविले गेले आहे की मी नैतिकता व उत्तम आचरणाला अंतिम शिखरापर्यंत पोचवावे.
- मी लोकांची कंबर धरून धरून त्यांना अग्नीत पडण्यापासून वाचवीत आहे, परंतु लोक मात्र अग्नीकडेच धाव घेत आहेत.
- मला जगवासियांसाठी कृपा बनवून पाठविले आहे. तुम्ही लोकांसाठी सोयी करा, संकटे उभी करू नका.
- आईवडिलांची सेवा करा. त्यांच्यासमोर मोठ्या आवाजात बोलू नका. त्यांचे तुमच्यावर मोठे उपकार आहेत, म्हणून तुम्ही त्यांचे आज्ञाधारक बनून राहा.

- जर आईवडिलांनी अन्याय करण्याची आज्ञा दिली तर ती मान्य करू नका. अन्य बाबींत त्यांच्या आज्ञेचे पालन करा.
- संपूर्ण मानवजातीला एकाच अल्लाहने निर्माण केले आहे, एकाच आईवडिलांची संतती आहे. त्यांच्यात रंग, वंश, जात, भाषा, क्षेत्र वगैरेंचा भेदभाव करणे घोर अन्याय होय.
- सर्व माणसे आदमची संतती होत. त्यांच्यावर प्रेम करा, तिरस्कार करू नका. त्यांना आशावान बनवा, निराश करू नका.
- मानवांत श्रेष्ठ तो आहे जो दुसऱ्यांचा हितचिंतक, पवित्र आचरण करणारा व अल्लाहचे आज्ञापालन करणारा असतो.
- तुम्ही जगवासियांवर दया करा, आकाशवाला (अल्लाह) तुमच्यावर दया करील.
- ती व्यक्ती सर्वात चांगली आहे जी स्वत:च्या घरवाल्यांसाठी व शेजाऱ्यांसाठी चांगली आहे.
- स्त्रिया, गुलाम व अनाथांवर विशेषत: दया करा.
- जो आपल्या मुले व मुलीत भेदभाव करीत नाही आणि मुलींचे चांगल्या प्रकारे पालनपोषण करतो, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करतो; तो स्वर्गात जाईल.
- जो वडीलधारी मंडळींचा आदर व लहानांवर प्रेम करीत नाही तो आमच्यापैकी नव्हे.
- तुम्ही ऐहिक जीवनात उन्मत्त होऊन हे विसरून जाऊ नका की तुम्हा सर्वांना तुम्ही केलेल्या कर्मांचा हिशेब आपल्या अल्लाहला द्यावयाचा आहे. परलोकातील यशच खरे यश होय.
- परलोकातील यातना फार कठोर आहेत. तेथे कुळ-वंश, सख्खे-सोयरे, धन-संपत्ती आणि कोणाचीही शिफारस उपयोगी पडणार नाही. अल्लाहचे आज्ञापालन व उत्तम आचरणच (त्या) यातनांपासून स्वत:ला वाचविण्याचे एकमात्र साधन होय.
- स्वत:ला व आपल्या कुटुंबियांना नरकाच्या अग्नीपासून वाचवा. तुमच्या संपत्तीत तुमचे आप्तेष्ट, गरीब व अनाथांचा वाटा आहे. त्यांची वाटणी त्यांना द्या.
- दुसऱ्यांची संपत्ती बेकायदेशीर खाऊ नका. व्यापार अथवा करारपत्राद्वारे कायदेशीर धन प्राप्त करा.
- वस्तूमध्ये भेसळ करू नका, मोजमाप करण्यात कमी करू नका. व्यापारांत फसवेगिरी करू नका. जो फसवितो तो आमच्यापैकी नव्हे.
- बाजारात भाव वाढावेत म्हणून (धान्य वगैरे) वस्तू न विकता (साठा करून) ठेवू नका असे करणारा घोर यातनेला पात्र आहे.
- धन मोजून-मोजून संचय करू नका आणि वायफळ खर्चसुद्धा करू नका. मध्यममार्ग स्वीकारा.
- दुसऱ्यांचे अपराध क्षमा करीत जा. दुसऱ्यांच्या दोषांचा प्रचार करू नका, ते लपवा,

अल्लाह तुमच्या दोषांवर पांघरूण घालील.

- खोटे बोलणे, चहाड्या करणे, खोटे आरोप करण्यापासून दूर राहा. लोकांना वाईट नावाने हाक मारू नका.
- अश्लीलता व निर्लज्जतेपासून दूर राहा, मग ती उघड असो की गुप्त.
- दिखाऊपणा करू नका. गुप्तदान करा. उपकार करून त्याची जाणीव करून देऊ नका.
- रस्त्यावरील त्रासदायक वस्तू (काटे, दगड वगैरे) काढून टाका.
- पृथ्वीवर हळूहळू चला. गर्व व अहंकार करू नका.
- जेव्हा बोलाल तेव्हा चांगले बोला नाहीतर गप्प राहा.
- आपले वचन व प्रतिज्ञा पूर्ण करा.
- सत्य व न्याय्य साक्ष द्या, मग तुमचे स्वत:चे अथवा तुमच्या कुटुंबियांचे नुकसान झाले तरी चालेल.
- अन्यायाविरुद्ध लढणारा अल्लाहला प्रिय असतो.
- एखाद्या पैलवानाला चित करण्यात शौर्य नाही तर खरी शूरता माणसाने रागावर ताबा मिळविण्यात आहे.
- मजुराचा घाम वाळण्यापूर्वी त्याची मजूरी द्या. कोणत्याही नोकराकडून त्याच्या शक्तीप्रमाणे काम करून घ्या. त्याच्या विश्रांतीकडे लक्ष द्या. तुम्ही स्वत: जे खाल ते त्याला द्या व जे स्वत: परिधान कराल ते त्यालासुद्धा नेसण्यास द्या.
- जनावरावर दया करा, त्यांच्या शक्तीपेक्षा अधिक काम करवून घेऊ नका.
- कोणत्याही वस्तूचा गरजेपेक्षा अधिक उपयोग करू नका. पाण्याचा दुरुपयोग करू नका, मग नदीच्या काठी का असेना.
- आपले शरीर, कपडे व घर स्वच्छ ठेवा. झोपेतून उठल्यावर सर्वप्रथम दोन्ही हात धुवा. तुम्हाला माहीत नसेल की तुमचे हात झोपेत कोठे कोठे गेले असतील.
- युद्धात स्त्रिया, मुले, आजारी आणि नि:शस्त्र सैनिकांवर हात उचलू नका. फळधारी झाडांना कापू नका.
- युद्धात पकडलेल्या सैनिकांशी चांगला व्यवहार करा, त्यांना यातना देऊ नका.
- एखादी वाईट गोष्ट पाहिली तर तिला प्रतिबंध करण्याचा पुरेपूर प्रयत्न करा. जर ते शक्य नसेल तर तिला मनापासून वाईट समजा.
- सर्व कर्म इच्छेवर आधारित आहेत. वाईट इच्छेने केलेल्या चांगल्या कर्मांचेसुद्धा फळ अल्लाहजवळ मिळणार नाही.
- अल्लाहला भेटण्याची आशा बाळगून जीवन जगा. आशेप्रमाणेच मानवाचे क्रियाकलाप होत असतात.

-०- समाप्त -०-